# वसंतराव माने यांचे गोवामुक्ती लढ्यातील योगदान

**धैर्यशील मारुती जाधव,** एम. ए. भाग २ इतिहास विभाग,
आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, जि. सांगली, dhairyasheelj501@gmail.com
**डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर,** सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा

---

**प्रस्तावना :-** २० वे शतक हे भारताच्या इतिहासातील एक अत्यंत महत्वाचे शतक मानले जाते. असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, छोडो भारत चळवळ यांसारख्या राजकीय चळवळी व दलित चळवळ, शेतकरी चळवळ, कामगार चळवळ यांसारख्या सामाजिक चळवळी २० व्या शतकात घडून आल्या. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये ज्या महत्त्वाच्या चळवळी झाल्या त्यामध्ये गोवामुक्ती लढ्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. गोव्यावर जवळजवळ ४५० वर्षे साम्राज्यवादी पोर्तुगीजांची सत्ता होती. गोवा आणि महाराष्ट्रातील जनतेच्या तीन दशकांच्या प्रयत्नांनंतर गोवा स्वतंत्र झाला. पोर्तुगीजांची अमानुष साम्राज्यवादी सत्ता संपुष्टात आली व गोव्यातील जनतेने मोकळा श्वास घेतला.

**शोध निबंधाचा उद्देश :** पाश्चात्य देशांच्या साम्राज्यवादास भारतीयांनी विविध चळवळींच्या माध्यमातून विरोध केला. काहींनी अहिंसक मार्गाचा अवलंब केला तर काहींनी सशस्त्र चळवळीच्या माध्यमातून लढा दिला. इतिहासलेखन करताना प्रामुख्याने या चळवळीच्या राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवरील नेतृत्त्वाला केंद्रस्थानी ठेवून लिखाण झालेले आपणास दिसते. परंतु याच चळवळीमधील स्थानिक पातळीवरील क्रांतिकारकांच्या कार्याबद्दल तितकेसे लिखाण झालेले नाही. आतापर्यंत ज्ञात नसलेल्या स्थानिक पातळीवरील अनेक स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान समाजासमोर येणे गरजेचे आहे. सावर्डे, ता. तासगाव येथील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक 'वसंतराव ज्ञानदेव माने' यांच्या गोवामुक्ती लढ्यातील कार्याचा आढावा घेणे हा या शोध निबंधाचा मुख्य उद्देश आहे.

**गोवामुक्ती लढ्याची पार्श्वभूमी:-** स्वातंत्र्यप्राप्तीसाठीच्या प्रदीर्घ संघर्षानंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले, परंतु भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील काही फ्रेंच व पोर्तुगीज वसाहतींना अजुनही स्वातंत्र्य प्राप्त झाले नव्हते. यातील पश्चिम किनाऱ्यावरील महत्त्वाची वसाहत म्हणजे गोवा. गोवा पोर्तुगीजांच्या ताब्यात होता. गोव्यातील लोक स्वतंत्र भारतात सामील होण्यासाठी उत्सुक होते. परंतु पोर्तुगालने आपली वसाहत कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. पोर्तुगाल नाटोचा सदस्य असल्याने पोर्तुगालला पाश्चात्य देशांचा पाठींबा होता. भारत सरकारने राष्ट्राराष्ट्रांतील वाद सामंजस्याच्या व शांततामय मार्गाने सोडविण्याच्या धोरणाचा अवलंब केला असल्याने भारत सरकार गोव्यामध्ये लष्करी कारवाई करण्यास उत्सुक नव्हते. त्यामुळे सुरुवातीला गोव्यातील जनतेनेच सर्व सूत्रे हाती घेऊन स्वातंत्र्यलढ्याला सुरुवात केली. पोर्तुगीजांनी दडपशाहीचा वापर करून लढा चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. देशाच्या विविध भागातील सत्याग्रहींनीसुद्धा गोवा- मुक्तीसाठी अहिंसक मार्गाने सत्याग्रह करत गोव्यामध्ये मोर्चा नेण्याचे प्रयत्न केले. पोर्तुगीज प्रशासनाने तेथेही अमानुष दडपशाहीचा वापर करून अनेक क्रांतिकारकांच्या हत्या केल्या. पोर्तुगालवर आंतरराष्ट्रीय लोकमताचा दबाव येऊन पोर्तुगाल गोव्यावरील आपली सत्ता सोडेल अशी भारताची अपेक्षा होती, परंतु ही अपेक्षा फोल ठरली. शेवटी १७ डिसेंबर १९६१ रोजी पंतप्रधान नेहरूंनी गोव्यातील पोर्तुगीजांवर लष्करी कारवाई करण्याचा आदेश भारतीय सैन्याला दिला. १९ डिसेंबर १९६१ रोजी भारतीय सैन्याने 'ऑपरेशन विजय' राबवत गोवा मुक्त केला. गोवामुक्तीसाठी जी आंदोलने व सत्याग्रह झाले त्यामध्ये देशभरातील विविध भागातील जनतेने योगदान दिले. यामध्ये वसंतराव ज्ञानदेव माने यांच्यासारख्या स्थानिक पातळीवरील अनेक सत्याग्रहींचा सहभाग होता.

**सुरुवातीचे जीवन :**

वसंतराव माने यांचा जन्म १५ जून १९३४ रोजी सांगली जिल्हयातील तासगाव तालुक्यातील सावर्डे या लहानशा खेडेगावात झाला. त्यांचे सातवीपर्यंतचे शिक्षण हे गावातील प्राथमिक शाळेत झाले. एक दिवस कर्मवीर भाऊराव पाटील सावर्डे गावी आले असता त्याची व वसंतरावांची भेट झाली. कर्मवीरांनी त्यांना पुढील

शिक्षणासाठी आपल्यासोबत सातारा येथे येण्यासंबंधी विचारणा केली. वसंतरावांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासोबत सातारा येथे जायचे ठरवले. कमवा व शिका योजनेअंतर्गत वसंतरावांनी आपले मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण सयाजीराव गायकवाड हायस्कूल सातारा येथून पूर्ण केले. पुढे पदवी शिक्षणासाठी वसंतरावांनी शिवाजी कॉलेज सातारा येथे प्रवेश घेतला. शिवाजी कॉलेज सातारा येथे वसंतरावांना बॅ. पी. जी. पाटील, डॉ. एन. डी. पाटील यांसारख्या थोर व्यक्ति प्राध्यापक म्हणून लाभल्या.

**गोवा मुक्ती लढ्यात सहभागी होण्यास प्रेरित ठरलेल्या घटना:-**

वसंतराव माने यांनी वयाच्या आठव्या वर्षी ३ सप्टेंबर १९४२ रोजी तासगाव येथे छोडो भारत चळवळी अंतर्गत झालेला सत्याग्रह वडीलांसोबत जवळून पाहिला होता. याच दरम्यान ७ सप्टेंबर रोजी वडूज येथे गोळीबारात ७ जण मृत्युमुखी पडले, तसेच १० सप्टेंबर रोजी इस्लामपूर येथे किलोस्कर कारखान्यातील पंडया नावाचा इंजिनिअर व कामेरी येथील बारपटे नावाचा क्रांतिकारक यांना हौतात्म्य प्राप्त झाले. या सर्व घटना वसंतरावांना वडीलांकडून सविस्तर समजत होत्या. या घटनांचा वसंतरावांच्या बालमनावर परिणाम झाला. त्याचबरोबर क्रांतिसिंह नाना पाटील, नागनाथअण्णा नायकवडी, जी. डी. बापू लाड यांसारख्या क्रांतिकारकांच्या कार्यामुळे देखील वसंतराव प्रभावीत झाले होते.

१९६० च्या दशकात गोवामुक्ती लढ्यामध्ये भाग घेऊन गोवामुक्तीसाठी कार्य करणाऱ्या क्रांतिकारकांच्या विरोधात पोर्तुगीज प्रशासनाने दडपशाहीचे धोरण अवलंबले होते. आंदोलने व सत्याग्रह या दोन्ही मार्गांनी पोर्तुगीजांना विरोध करणाऱ्या क्रांतिकारकांच्या पोर्तुगीजांनी हत्या केल्या होत्या. पोर्तुगीजांच्या अमानुष दडपशाहीमुळे मृत्युमुखी पडलेल्या महाराष्ट्रातील क्रांतिकारकांचे पार्थिव शरीर गोव्याहून बेळगाव येथे आणले जात होते व तेथून कोल्हापूर-सातारा मार्गे पुणे आणि त्यांच्या इतर संबंधित गावी पोहोचविले जात होते. यावेळी वसंतराव सातारा येथील शिवाजी कॉलेजमध्ये पदवीच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत होते. गोव्यातील मृत क्रांतिकारकांना घेऊन जाणारी वाहने शिवाजी कॉलेजच्या प्रवेशद्वारासमोरून जात असत. ते दृष्य पाहून वसंतराव व त्यांच्या साथीदारांचे मन हेलावून जात होते. या सर्व घटनांमुळे वसंतरावांच्या मनात क्रांतिकारी विचारांची ज्योत पेटून गोवामुक्ती लढ्यात सहभागी होण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली.

**गोवामुक्ती लढ्यातील योगदान :-**

क्रांतिकारी विचारांनी प्रेरित झालेल्या वसंतराव व त्यांच्या २६ सहकाऱ्यांनी गोवामुक्ती लढ्यात सहभाग घेऊन गोवामुक्तीसाठी प्रयत्न करण्याच ठरवले. वसंतराव आपल्या सहकाऱ्यांसमवेत रेल्वेने कोरेगाव येथून बेळगाव येथे आले. भारताच्या इतर भागातील लोकांना सत्याग्रह व आंदोलनाकरीता गोव्यात प्रवेश करता येऊ नये यासाठी प्रशासनाने राज्य परिवहन बसेसचे परिचालन बंद ठेवले होते. त्यामुळे वसंतराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी पायी चालत गोव्याकडे जाण्याचे ठरवले. बेळगावहून पायपीट करत २ दिवसांच्या सलग प्रवासानंतर जवळ जवळ १०० किलोमीटरचे अंतर पार करून, आंबोली घाट ओलांडून ही सर्व मंडळी सावंतवाडी येथे पोहोचली, सत्याग्रहाची दिशा निश्चित करून वसंतराव व त्यांचे सहकारी सावंतवाडीहून बांदामार्गे महाराष्ट्र-गोवा सीमेवरील गोव्याच्या हद्दीतील पत्रादेवी या ठिकाणी पोहोचले. तेथील स्थानिक नागरीकांनी त्यांची राहण्याची व्यवस्था केली. स्थानिक नागरिकांसोबत पत्रादेवी येथे सत्याग्रह करण्यास वसंतराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरुवात केली. याच दरम्यान ९ ऑगस्ट १९५५ रोजी 'गोवा विमोचन समितीने' काश्मिर पासून कन्याकुमारी पर्यंत सर्व ठिकाणचे मिळून तब्बल ५ हजार कार्यकर्ते १५ ऑगस्ट १९५५ रोजी गोव्यात प्रवेश करतील अशी घोषणा केली. १५ ऑगस्ट १९५५ रोजी भाई विष्णूपंत चितळे यांच्या नेतृत्त्वाखाली ५०० सत्याग्रहींच्या पहिल्या तुकडीने गोव्यात प्रवेश केला. वसंतराव व त्यांचे सहकारी या तुकडीत सामील झाले. सत्याग्रह सुरू असताना पोर्तुगीज शिपायांनी दडपशाहीच्या मार्गाचा अवलंब करून सत्याग्रहींना मारहाण केली, बेछूट गोळीबार झाला यामध्ये अनेक सत्याग्रही धारातीर्थी पडले व अनेक गंभीर जखमी झाले. या जखमी सत्याग्रहींच्या उपचारासाठी स्थानिक नागरीकांनी मदतीचा हात पुढे केला व त्यांना उपचारांसाठी मदत केली.

**कर्मवीरांचे मार्गदर्शनाचे शब्द :-**

काही दिवसांनी वसंतराव व त्यांचे सहकारी पत्रादेवीहून साताऱ्याला परत आले. या दरम्यान कर्मवीर भाऊराव पाटील आजारी असल्यामुळे पुण्यातील ससून रुग्णालयात दाखल होते. कर्मवीर भाऊराव पाटील साताऱ्याला माघारी परत आल्यावर त्यांनी वसंतराव व त्यांच्या सहकाऱ्यांना बोलावून घेतले. वसंतराव व त्यांचे सहकारी कर्मवीरांच्या भेटीस गेल्यावर कर्मवीरांनी गोवामुक्ती लढ्यातील सहभागाबद्दल त्यांचे कौतुक केले. परंतु शिक्षणाकडे दुर्लक्ष करून लहान वयात चळवळीमध्ये सहभाग घेणे उचीत नाही, असे सांगताना भाऊराव पाटील म्हणाले "आता यापुढे उच्चशिक्षित होऊन अशिक्षित घटकांना शिक्षण दया म्हणजे तुमच्यासारखे हजारो तरुण-तरुणी तयार होतील व भविष्यातील भारत घडविण्यासाठी मोलाचे योगदान देतील." कर्मवीर भाऊराव पाटीलांच्या या शब्दांचा वसंतरावांच्या मनावर खोल प्रभाव पडला व पुढे उच्चशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी शिक्षण क्षेत्रातही आपले योगदान दिले.

**गोवामुक्ती नंतरचे कार्य:-**

वसंतराव पदवीच्या द्वितिय वर्षात असताना गोवामुक्ती लढ्यात सहभागी झाले होते. पदवीनंतर पदव्यूत्तर शिक्षणासाठी त्यांनी एलफिस्टन महाविदयालय मुंबई येथे प्रवेश घेतला. यानंतर त्यांनी इतिहास विषयाचे प्राध्यापक म्हणून काही काळ तासगाव व कोल्हापूर येथे नोकरी केली. 1977 ते 1993 या काळात वसंतराव आष्टा येथील कला व वाणिज्य महाविद्यालय येथे प्राचार्यपदी कार्यरत होते. आपल्या शिक्षणक्षेत्रातील कार्यकाळात देखील वसंतरावांनी आपल्या अध्यापनाच्या शैलीतून तरुण पिढीत देशभक्तीची बिजे रोवण्याचे काम केले. अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होऊन देशाच्या विकासकार्यामध्ये विविध सामाजिक घटकांचा सहभाग कसा वाढवता येईल यासाठी वसंतरावांनी प्रयत्न केले.

**शासनामार्फत झालेले सत्कार :-**

वसंतरावांच्या गोवामुक्ती लढ्यातील कार्याची दखल घेत केंद्रशासन, महाराष्ट्र शासन व स्थानिक प्रशासनामार्फत त्यांचे अनेक सत्कार झाले. त्यापैकी काही निवडक सत्कारांचा तपशील पुढीलप्रमाणे...

1. महाराष्ट्र शासनामार्फत ९ ऑगस्ट २००७ रोजी क्रांतीदिनादिवशी सत्कार
2. माजी राष्ट्रपती मा. रामनाथ कोविंद यांच्या हस्ते ९ ऑगस्ट २०१८ रोजी ऑगस्ट क्रांतीदिवशी सत्कार.
3. पालकमंत्री व जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्या हस्ते २६ जानेवारी २०२२ रोजी प्रजासत्ताक दिनादिवशी सत्कार

**सारांश :-**

वसंतराव ज्ञानदेव माने यांचा लहानपणापासून विविध चळवळींशी संपर्क आला होता. त्यामुळे लहानपणापासूनच त्यांच्या मनावर क्रांतीकारी विचारांचे संस्कार झाल होते. या क्रांतीकारी विचारांना जोड मिळाली ती कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या देखरेखीखाली मिळालेल्या शिक्षणाची. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना कमी वयात गोवामुक्तीलढ्यात सहभाग घेऊन वसंतराव माने यांनी तत्कालिन तरुणांसमोर देशभक्तीचा एक आदर्श निर्माण केला. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मार्गदर्शनाने प्रभावित होऊन वसंतरावांनी आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात शिक्षण क्षेत्रासाठी देखील बहुमुल्य असे योगदान दिले. वसंतराव माने यांच्या कार्याची दखल घेवून शासकीय पातळीवर देखील त्यांचा गौरव झाला.

**संदर्भ :-**

1. मुलाखत : वसंतराव ज्ञानदेव माने, ७ जून २०२२
2. मिलिंद चंपानेरकर आणि सुहास कुलकर्णी, असा घडला भारत, रोहन प्रकाशन, पृ. २६३
3. बिपिन चंद्र, मृदुला मुखर्जी आणि आदित्य मुखर्जी (अनुवाद : मा. कृ. पारधी, प्रा.व्ही. सी. फडके, डॉ अरुण जोशी, प्रा. एम. बी. नातू), इंडिया सिन्स इंडिपेंडन्स, के. सागर पब्लिकेशन्स, पंधरावी आवृत्ती २०१८,पृ. ८७
4. डॉ. सच्चिदानंद शेवडे व दुर्गेश परुळकर, गोवा मुक्तीसंग्राम, नवचैतन्य प्रकाशन पृ. २१९
5. गणेश मंत्री, गोवा मुक्ती संघर्ष, जनसंज्ञापन व पत्रकारीता विभाग- आय. टी. एम विद्यापीठ ग्वाल्हेर, २०२१